D1
२७/०६/२३
४:२०

# उल्हासनगर महानगरपालिका
## माहिती व जनसंपर्क विभाग

दिनांक : २७/०६/२०२३

## प्रसिध्दी पत्रक (प्रेसनोट)

समग्र शिक्षा समावेशित शिक्षण व दिव्यांग कल्याणकारी योजना उपक्रमांतर्गत विशेष गरजा असणा-या दिव्यांग मुलांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात टिकवून ठेवण्याकरिता केंद्रस्तर, शाळास्तर, शाळेतील शिक्षकांना व अंगणवाडी शिक्षक यांची जनजागृती होणे आवश्यक आहे. याकरिता नवनवीन उपक्रम, नवीन विचार, तंत्रपध्दती व संकल्पनांचा उदय इत्यादी कार्यक्रम दरवर्षी समग्र शिक्षा उपक्रमांतर्गत घेण्याबाबत केंद्र व राज्य शासनाने आदेशित केले आहे. त्या अनुषंगाने मा.आयुक्त तथा प्रशासक श्री. अजीज शेख साहेबांच्या मार्गदर्शनाने व प्रेरणेने उध्बोधन कार्यशाळा दि. २७ जून, २०२३ रोजी महानगरपालिका मुख्य कार्यालय महासभा सभागृह येथे सकाळी ११ ते २ वाजेपर्यंत आयोजित करण्यात आले होते. सदर कार्यशाळेमध्ये मा. प्रकल्प संचालक श्री. किशोर गोईल अंध, फाउंडेशन, मुंबई यांनी उत्कृष्टरित्या मार्गदर्शन केले आहे. त्यांनी जॉय स्कील काष्ट नावाची कंपनी स्थापना केली यामध्ये २०० पेक्षा जास्त दृष्टीहीन व्यक्तींना रोजगार मिळवून दिले आहे. डॉ. हेलन केलर जयंती साजरी करण्याकरिता मा. आयुक्त तथा प्रशासक श्री. अजीज शेख साहेबांनी समग्र शिक्षा समावेशित शिक्षण विभागाला आदेशित केले होते. सदर जनजागृती कार्यशाळेमध्ये मा. आयुक्त तथा प्रशासक श्री. अजीज शेख यांनी दिव्यांगावर कशी मात करता येईल याबाबत सकारात्मक व प्रोत्साहनात्मक विचारांची देवाणघेवाण व्हावी याकरिता प्रशिक्षण आयोजित करण्यात आले होते. डॉ. हेलन केलर यांनी मुकबधीर व दृष्टीहीन असुन सुध्दा त्यांनी कठीण संघर्ष करुन यश कसे संपादन केले याबाबत प्रेरणादायक संकल्पना सर्व शाळेतील शिक्षकांना होणे गरजेचे आहे, असे मा.आयुक्त तथा प्रशासक श्री. अजीज शेख यांनी आपल्या शब्दात टिप्पणीमध्ये मांडले आहे. त्यामुळे जमलेले सर्व शिक्षकांनी मा. आयुक्त साहेबांच्या या विचाराचा टाळयांच्या वर्षाव करून स्वागत केले. सदर उध्दबोधन कार्यशाहेकरिता मा.उप-आयुक्त श्री. अशोक नाईकवाडे, डॉ. सुभाष जाधव, जनसंपर्क अधिकारी सौ. छाया डांगळे तसेच श्री. राजेश घनघाव, श्री. सुंदर डांगळे, श्री. शांताराम चौधरी, श्रीम. विशाखा सावंत, श्री. मनिष हिवरे हे अधिकारी उपस्थित होते. सदर कार्यक्रमाचे सुत्रसंचालन श्री. नामदेव भालेराव यांनी केले. कार्यक्रमाचे संपूर्ण नियोजन समग्र शिक्षाच्या जिल्हा/मनपा समन्वयक श्रीम. संगीता लहाने यांनी केले. तसेच कार्यक्रम यशस्वी करण्याकरिता श्री. अमोल साबळे, हर्षदा नक्षीवाले, राजश्री पाटील, योगिता होलगीर यांनी सहकार्य केले. सदर कार्यक्रमामध्ये उल्हासनगर क्षेत्रातील सर्व शाळेतील शिक्षक, अंगणवाडी शिक्षक, स्वयंसेवी संस्था यांनी प्रचंड प्रमाणामध्ये उपस्थित राहून मोठ्या संख्येने सहभाग घेतला.

सदरचा जनजागृती कार्यक्रम मा. आयुक्त तथा प्रशासक श्री. अजीज शेख यांच्या मार्गदर्शनाने व प्रेरणेने घेण्यात आलेला आहे.

Dangale 27/6/23

(छाया प्रकाश डांगळे)
जनसंपर्क अधिकारी
उल्हासनगर महानगरपालिका

प्रत — योग्य त्या कार्यवाहिस्तव रवाना.

१) पत्रकार कक्ष, उल्हासनगर महानगरपालिका

२) सिस्टीम ॲनलिस्ट, माहिती तंत्रज्ञान विभाग, उल्हासनगर महानगरपालिका

- सदरची प्रेस नोट उल्हासनगर महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावी.